## प्रकरण सहावे

## "स्त्री-संग्रहण, त्याबद्दल शासन, प्रायश्चित्त इ·विचार"

"अलङ्कृतां हरेत्कन्यामुत्तमं ह्यनथाधमम्।
दण्डं दद्यात्सवर्णासु प्रातिलोम्ये वधः स्मृतः।।"
{या·स्मृ·2·24·287}

"अवरूद्धासु दासीषु भुजिष्यासु तथैव च ।
गम्यास्वपि पुमान्दाप्यः पञ्चाशत्पणिकं दमम् ।।"
{या·स्मृ·2·24·290}

...LIBRARY
...SITY, KOLHAPUR

# प्रकरण सहावे

## स्त्री-संग्रहण, त्याबद्दल शासन, प्रायश्चित्त इ·विचार·

**प्रस्तावना :-**

इतर धर्मशास्त्रांप्रमाणेच याज्ञवल्क्यस्मृतीने देखील स्त्री-पुरुष संबंधाची चर्चा अतिशय सूक्ष्मपणे केली आहे· हे संबंध शुद्ध स्वरूपात राहावेत, असा स्मृतिकाराचा आग्रह दिसतो· हे संबंध बिघडल्यास त्याचा गंभीर परिणाम स्त्री जीवनावर होत असतो· त्यामुळे अशा संबंधाला बाधा करणारा पुरुष तितकाच जबाबदार मानून याज्ञवल्क्याने त्याला शिक्षा सांगितली आहे· प्रस्तुत स्त्री संग्रहण प्रकरणातील विचार पुढीलप्रमाणे मांडता येतील·

**स्त्री संग्रहणाचे प्रकार :-**

स्त्री संग्रहण हे एक विवादपद आहे· स्त्री संग्रहणाचा साधा अर्थ व्यभिचार किंवा एखाद्या स्त्री बरोबरचा अवैध संभोग, याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये[1] "एक पुरूष आणि एक स्त्री यांचे संभोगासाठी अवैधिक म्हणजे कायद्याविरूद्ध रीतीने एकत्र येणे म्हणजे स्त्रीसंग्रहण असे म्हटले आहे·

व्यासाने त्याचे तीन प्रकारचे स्वरूप सांगितले आहे-

1· एकांतात देश, काल व भाषा यांचे उल्लंघन करून परस्त्रीकडे वाकडया दृष्टीने पाहणे व तिच्याशी हसणे हे प्रथम साहस होय·

2· परस्त्रीकडे गंध, पुष्पे, धूप, भूषणे वस्त्रे इ·पाठविणे, अन्न-पान इ·नी लोभ उत्पन्न करणे हे मध्यम साहस होय·

3· एकांतात एकत्र बसणे, परस्परांचा आश्रय करणे, केस धरणे इ·हे पूर्णसंग्रहण नावाचे तिस-या प्रकारचे साहस सांगितले आहे·

स्त्री-संग्रहणाबाबत शिक्षा :-

या स्त्री संग्रहणाबद्दल त्या कर्त्याला विशिष्ट शिक्षा सांगितली आहे. तथापि ते कसे ओळखावे यासाठी उपाय सांगितला आहे.-

"पुमान संग्रहणे ग्राह्यः केशाकेशी परस्त्रियाः।
सद्यो वा कामजैश्चिह्नैः प्रतिपत्तौ द्वयोस्तथा।।"[2]

"संग्रहणास प्रवृत्त झालेल्या पुरूषास केशाकेश्यादी लिंगावरून जाणून धरावे. परभार्येशी केशाकेशी क्रीडा केल्याने ताज्या नखांच्या व दातांच्या व्रणांवरून, रागकृत चिन्हांवरून अथवा दोघांच्याही संमतीने जाणून संग्रहणामध्ये प्रवृत्त झालेल्यास धरावे" प्रस्तुत ठिकाणी केशाकेशी याचा अर्थ एकमेकांचे केस धरून क्रीडा करणे असा दिला आहे. नियोगामध्ये प्रवृत्त झालेल्या व बंदी केलेल्या स्त्रीचे निराकरण करण्यासाठी येथे परस्त्रीचे ग्रहण केले आहे.

"नीवीस्तनप्रावरण सक्थिकेशावमर्शनम्।
अदेशकालसंभाषं सहैकासनमेव च।।"

"जो परस्त्रीच्या नेसलेल्या वस्त्राच्या गाठीला, कुचप्रावरणाला, जघनाला व केसाला मोठ्या अभिलाषेने स्पर्श करतो. त्याचप्रमाणे निर्जनप्रदेशी अथवा अंधकाराने व्यापलेल्या जनवियुक्त स्थानी तिच्याशी भाषण करतो, परभार्येसह रममाण होण्याच्या इच्छेने एका मंचकावर इ.बसतो, तोही संग्रहणास प्रवृत्त झाला आहे असे जाणून त्याला धरावे."[3]

यापुढे मिताक्षरासारामध्ये म्हटले आहे की, वरील कृत्यांमुळे तो पुरूष परस्त्री संग्रहणास प्रवृत्त झाला आहे. याप्रमाणे त्याच्या दोषाची शंका आली तरच त्याला पकडावे. इतरांना नव्हे असे मनुस्मृतीत सांगितले आहे. परस्त्रीने स्पर्श केला असता त्याला जो सहन करतो त्याला धरावे असे म्हटले[5] आहे. जो एखादा धीट मोठ्या प्रौढीने "मी अमक्या प्रौढ सुंदरीचा एकदा उपभोग घेतला आहे", असे बरोबरीच्या लोकांना सांगत असेल तर त्यालाही धरावे.

"संग्रहण हे बलात्काराने फसवून आणि विषयोपभोगाच्या इच्छेने असे तीन प्रकारांनी घडवून आणलेले असते. पहिल्या प्रकारात होणारा संभोग स्त्रीच्या इच्छेविरूद्ध, दुस-या प्रकारात होणारा संभोग स्त्रीला फसवून आणि तिस-या प्रकारात होणारा संभोग

तिच्या संमतीने होत असतो· तिस-या प्रकारच्या संग्रहणाचे क्षुल्लक, मध्यम आणि गंभीर असे तीन भेद पडतात· क्षुल्लकामध्ये एखाद्या स्त्रीकडे पाहून हसणे, नेत्रसंकेत करणे यांच्यासारख्या दूर अंतरावरून केलेल्या क्रिया येतात· मध्यम प्रकारात तिला फुले, फळे देणे इ·त्यापेक्षा निकट क्रिया येतात आणि गंभीर प्रकारात स्त्री बरोबर एकाच शय्येवर निजणे, चुंबनादि निकटच्या क्रिया येतात·"[6]

ज्यांचा निषेध केला आहे अशा स्त्री-पुरुषाने एकमेकांशी संभाषण इ·करू लागल्यास त्या विषयी दंड सांगितला आहे·-

"स्त्री निषेधे शतं दद्यात्द्विशतं तु दमं पुत्रान्।
प्रतिषेधे तयोर्दण्डो यथा संग्रहण तथा।।"[7]

पती, पिता इत्यादिकांनी ज्याच्याशी संभाषण इ·करण्याचा निषेध केला आहे· त्याच्याशी जी संभाषण इ·करते त्या स्त्रीला शंभर पण दंड करावा· असा निषेध असूनही संभोगास प्रवृत्त होणा-या दोघांना त्यांच्या वर्णानुसार जो दंड सांगितला आहे, तो जाणावा·

पण हे सर्व प्रतिपादन चारण इ·कांच्या भार्यास सोडून इतरांविषयी आहे, असे मनुस्मृती[8]मध्ये म्हटले आहे·

दुस-याच्या पत्नीबरोबर किंवा कन्येबरोबर बोलणे इ·हा अपराध समजला जात असल्याचे दिसते· त्यासाठी याज्ञवल्क्याने विशिष्ट दंडाची शिक्षा सांगितली आहे· परंतु हा नियम चारण, नट, गवई यांच्यासारख्या आपल्या स्त्रियांच्या कमाईवर उपजीविका करणा-या लोकांच्या स्त्रियांना लागत नाही· कारण असे लोक आपण होऊन आपल्या स्त्रियांची इतरांना ओळख करून देतात आणि त्यांना परक्या पुरुषांबरोबर मिसळू देतात असे मनुस्मृतीत[9] म्हटले आहे·

यानंतर याज्ञवल्क्याने संग्रहणाविषयी दंड सांगितला आहे·-

"सजातावुत्तमो दण्ड आनुलोम्ये तु मध्यमः।
प्रतिलोम्ये वधः पुंसो नार्याः कर्णादिकर्तनम्।।"[10]

"सर्व वर्णातील पुरूषांनी सजातीय स्त्रीचे संग्रहण केल्यास उत्तम साहस, ब्राह्मण इ·आनुलोम्याने क्षत्रिय इ·स्त्रियांशी गमन केल्यास मध्यम साहस, प्रतिलोम्य-हीन वर्ण पुरूषाने उत्तम वर्ण स्त्रीचे संग्रहण केल्यास पुरूषाचा वध, आणि स्त्रियांचे

बाबतीत कान इ·कापावेत·

अपरार्कादी टीकेप्रमाणेच मिताक्षरासारामध्ये श्लोकासंबंधी मनू, नारद इ·चे स्त्री-संग्रहणाबाबतचे विचार पुढीलप्रमाणे मांडले आहेत·

"चारही वर्णांतील पुरुषांनी सजातीय रक्षित परस्त्रीशी बलात्काराने गमन केल्यास एक सहस्त्र पैंशी पण दंड करावा· जेव्हा कोणी आनुलोम्याने हीनवर्णाच्या अरक्षित स्त्रीशी गमन करतो, तेव्हा त्याला मध्यम साहस दंड करावा· जेव्हा कोणी एखादा अरक्षित सवर्ण स्त्रीशी किंवा अनुलोम्याने रक्षित स्त्रीशी समागम करतो तेव्हा त्याच्या दंडाचा विशेष मनुस्मृतीत सांगितला आहे· रक्षित ब्राह्मणीशी बलात्काराने गमन करणा-या ब्राह्मणाला पाचशे, इच्छा करणा-या तिच्याशी गमन करणा-याला सहस्त्र, रक्षित क्षत्रिया व वैश्य यांच्याशी गमन करणा-या ब्राह्मणालाही सहस्त्र दंड करावा· शूद्र स्त्रीशी गमन करणा-या क्षत्रियाला व वैश्याला सहस्त्र दंड करावा· पण हे गुरू व मित्र यांच्या भार्यांना सोडून इतर स्त्रियांविषयी सांगितले आहे· कारण नारदाने माता, मातृष्वसा (मावशी), सासू, मामी, आत्या, चुलती, शिष्याची स्त्री, भगिनी, तिची मैत्रीण, सून, कन्या, गुरुपत्नी, सगोत्रा, शरणागता, राणी, संन्याशिण, दाई, साध्वी स्त्री व उत्तमवर्णाची स्त्री यातील एखाद्या स्त्रीशी गमन करणा-यास गुरुस्त्रीगामी असेच म्हणतात व त्याला यासाठी शिश्न कापणे याशिवाय दुसरा दंडच नाही असे सांगितले आहे· प्रतिलोम्याने उत्कृष्ट वर्णाच्या सुरक्षित स्त्रीशी गमन केल्यास क्षत्रियादिकांचा वध करावा, पण अरक्षित स्त्रीशी गमन केल्यास त्याला धनदंड द्यावा· कारण मनुस्मृतीत[11] तसे सांगितले आहे· पण शूद्र अरक्षित उत्कृष्ट वर्णाच्या स्त्रीशी संगत झाल्यास त्याचे सर्वस्वहरण करावे व लिंग कापावे पण सुरक्षित उत्कृष्ट स्त्रीशी गमन करणा-या त्याचे सर्वस्व हरण करून शिवाय वध करावा·[12] हीन वर्णाच्या पुरुषाशी गमन करणा-या स्त्रीचे कान, नाक इ·कापावे· आनुलोम्याने अथवा आपल्याच वर्णाच्या पुरुषाशी तिने गमन केल्यास तिला दंडच करावा· येथे वध इ·चा जो उपदेश केला आहे· तो राजासाठीच आहे· कारण राजालाच पालनाचा अधिकार असतो· नुसत्या द्विजातीला नसतो· कारण ब्राह्मणाने परीक्षा पाहण्यासाठीही शस्त्र उचलू नये असे सांगितले आहे· पण राजाला निवेदन करण्यामध्ये विलंब लागून उगीच काळ जाईल, अशी भीती वाटत असल्यास "शस्त्रं द्विजाति भिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते" या मनुवचनास अनुसरून स्वतःस जारादिकांस मारावे· त्याचप्रमाणे मनुस्मृतीत[13] आततायीस मारण्यासाठी शस्त्र उचलण्याची परवानगी

परवानगी दिली आहे· त्याचप्रमाणे क्षत्रिय व वैश्य यांनी परस्परांच्या स्त्रीशी गमन केल्यास क्रमाने सहस्त्र व शतपणात्मक दंड जाणावा·"

स्त्री-संग्रहणाच्या अपराधाबद्दलची शिक्षा त्या अपराधाशी संबंध असलेला पुरूष आणि स्त्री यांची जात, तसेच ती स्त्री विवाहित होती किंवा अविवाहित होती, आणि ती स्त्री संरक्षित होती किंवा असंरक्षित होती ह्यांना अनुसरून भिन्न असल्याचे दिसते· स्त्री-संग्रहणाच्या अपराधाबद्दल याज्ञवल्क्याने जी शिक्षा जाती इ·नुसार भिन्न-भिन्न सांगितली आहे· ती भेदावर आधारित दिसते· स्त्री आणि पुरूष या दोहोंच्या संमतीने हा व्यभिचार घडला असेल तर त्या दोघांनाही समान शिक्षा हवी· त्यामध्ये केवळ पुरूषाकडे दोष असेल तर त्यानुसार त्याला शिक्षा, स्त्रीकडे चूक असेल तर तिलाही शिक्षा व्हावयास हवी· शिक्षेबाबत वर्ण, स्त्री-पुरूष असा कोणताही भेद नसावा· सर्वांना सारखीच शिक्षा असावी· या अपराधाबाबत सर्वांनाच जरब बसेल अशी शिक्षा हवी· म्हणजे अशा प्रकारांना समाजामध्ये आळा बसेल·

यानंतर याज्ञवल्क्याने कन्येचा अपहार करणा-याविषयी दंड सांगितला आहे·

"अलङ्कृतां हरेत्कन्यामुत्तमं ह्यनथाधमम्।

दण्डं दद्यात्सवर्णासु प्रातिलोम्ये वधः स्मृतः।"[14]

"सवर्ण अलंकृत कुमारीचे हरण करणा-यास उत्तम साहस दंड, अनलंकृत कन्येचे हरण करणा-यास प्रथम साहस आणि हीन वर्णियाने उत्तम वर्ण कन्येचे हरण केल्याबद्दल वध दंड द्यावा·" असे अपरार्क टीकेत म्हटले आहे तर मिताक्षरासारात पुढीलप्रमाणे म्हटले आहे·-

"विवाहास सज्ज झालेल्या अलंकृत सवर्ण कन्येस जो हरण करतो, त्यास उत्तम साहस दंड करावा· विवाहास सज्ज न झालेल्या सवर्ण कन्येचे हरण करणा-यास प्रथम साहस दंड द्यावा· उत्कृष्ट वर्णाच्या कन्येचा अपहार करणा-या क्षत्रियादिकांचा वधच करावा· अपहार करणा-याला दंड सांगितलेला असल्यामुळे अपहारकर्त्यापासून तिला दूर करून दुस-या योग्य पुरूषाच्या स्वाधीन करावे, असे सूचित होते·"

याज्ञवल्क्याने लग्नासाठी उभ्या राहिलेल्या, दागिन्यांनी युक्त वधूला पळविणा-यास उत्तम साहस म्हणजे एक हजार पण एवढा दंड, दागिन्यांनी युक्त नसलेल्या, अविवाहित कन्येसाठी शंभर पण म्हणजे प्रथम साहस दंड सांगितला आहे,

हीन वर्णियाने उत्तम वर्णाच्या कन्येचा अपहार केल्यास त्याचा वध करावा असे सांगितले आहे· मिताक्षरासारात म्हटले आहे की, अपहारकर्त्याला शिक्षा सांगितली असल्याने अशा पुरूषापासून तिला दूर करून दुस-या योग्य पुरूषाच्या स्वाधीन तिला करावे· तथापि अपहृत कन्येचा स्वीकार करण्याला समाजातील व्यक्ती नाखुष असतात· त्यामुळे ही गोष्ट असंभवनीय नसली तरी कठीण वाटते·

अनुलोम कन्येचा अपहार केला असता दंड सांगितला आहे-

"सकामास्वनुलोमासु न दोषस्त्वन्यथा दमः।"

"जर कोणी एखाद्याने, त्याची कामना करणा-या हीन वर्णाच्या कन्येचा अपहार केला तर, त्याचा काही फारसा दोष नसल्यामुळे त्याला दंड करू नये· पण इच्छा न करणा-या हीन वर्णाच्याही कन्येला जर कोणी हरण केले तर त्याला प्रथम साहस दंड करावा·"[15]

या श्लोकाच्या उत्तरार्धात म्हटले आहे-

"दूषणे तु करच्छेद उत्तमायां वधस्तथा"।।

अपरार्क टीकेमध्ये याविषयी म्हटले आहे- "जो कन्येला अंगुलीने योनिक्षत करून दूषित करतो त्याला करच्छेद हा दंड द्यावा· हा दोष उत्तमवर्णकन्येच्या बाबतीत घडल्यास दूषित करणा-याचा वध करावा· या ठिकाणी "कर" शब्दाचा अर्थ "बोटे" असा घ्यावा·"

दीपकलिकेत म्हटले आहे "इच्छन्तीष्वनुलोमासु अभिगमनार्थं हरणे न दोषः। समानजातीयासु कन्यासु गमनव्यर्ज्यं अहंकारेण अंगुलिप्रक्षेप मात्रदूषणे हस्तच्छेदः। उत्तमायां वध एव।"

मिताक्षरासारामध्ये या श्लोकाचे विवेचन मनुस्मृतिच्या आधारे पुढीलप्रमाणे केले आहे - "अनुलोमकन्येला जर कोणी तिची इच्छा नसताना बलात्काराने नखक्षतादिकांच्या योगाने दूषित केले तर त्याचा हात तोडावा· तथापि इच्छा न करणा-या हीनवर्णाच्या कन्येला योनीला अंगुली वगैरे घालून जो क्षत करतो व अशा रीतीने तिला दूषित करतो त्याला मनुस्मृतीत[16] सांगितल्याप्रमाणे सहाशे पण दंड करून शिवाय त्याची बोटे कापावी· पण ती कन्याच सकामा असून तिला जर त्याने दूषित केले तर अंगुलिच्छेद करू नये· पण त्याने पुनः असे करू नये म्हणून त्याला दोनशे पण दंड करावा· एखाद्या

कन्येनेच दुस-या कन्येला दूषित केल्यास तिला दोनशे व एखाद्या समजदार म्हणजे चतुर प्रौढ स्त्रीने तिला दूषित केल्यास त्या स्त्रीचे तत्काल मुंडन करावे. अंगुलीचे छेदन करावे. व गाढवावर बसून धिंड काढावी. जेव्हा सकाम अथवा अकाम उत्तम वर्णाच्या कन्येशी हीन जातीचा क्षत्रियादी पुरुष गमन करतो तेव्हा वधच करणे योग्य आहे. जेव्हा कोणी सकाम सवर्ण कन्येशी गमन करतो तेव्हा तिच्या पित्याला त्याची इच्छा असल्यास गायीचे जोडपे, हे शुल्क द्यावे. पण पिता शुल्क घेण्याची इच्छा करीत नसल्यास तेच राजाला दंडरूपाने द्यावे. पण अकाम सवर्ण कन्येशी गमन करणाराही वधास पात्र होतो. इ."

यानंतर याज्ञवल्क्यस्मृती म्हणते-

"शतं स्त्रीदूषणे दद्याद्द्वे तु मिथ्याभिशंसने।
पशून्गच्छञ्शतं दाप्यो हीनां स्त्रीं गां च मध्यमम्।।"[17]

"कन्येला कोणी तिच्यामध्ये वस्तुतः असलेलेच अपस्मार, राजयक्ष्मा, इ. दीर्घकाल रा... व निंद्य रोग अथवा मैथुनादि दोष यास प्रगट करू लागला तर त्याला शंभर पण दंड करावा. पण तिच्यामध्ये नसलेले दोष जर तो खोटेच तिच्यावर लादू लागला तर त्याला दोनशे पण दंड द्यावा. कोणी मूर्ख गायीशिवाय दुस-या पशूंशी जर गमन करीत असताना आढळला तर शंभर पण दंड करावा. जो कोणी सकाम अथवा अकाम हीन अन्त्यावसायिनी चांडाल स्त्रीशी अथवा गायीशी गमन करतो, त्याला मध्यम साहस दंड करावा" याप्रमाणे मिताक्षरात म्हटले आहे.

**रखेली स्त्रियांच्या संग्रहणाबाबत दंडयोजना :-**

याज्ञवल्क्यास्मृतीने इतर स्त्रियांबरोरब रखेली स्त्रियांच्या ज्याला आपण वेश्या संबोधितो, त्यांच्या संग्रहणाबाबतही दंडयोजना सांगितली आहे-

"अवरुद्धासु दासीसु भुजिष्यासु तथैव च।
गम्यास्वपि पुमान्दाप्यः पञ्चाशत्पणिकं दमम्।।"[18]

या श्लोकात रखेली स्त्रियांचे अवरुद्धा आणि भुजिष्या असे दोन प्रकार सांगितले आहेत. अवरुद्धा स्त्रीला घरातच बाळगलेली असते आणि तिला दुस-या कोणत्याही पुरुषाबरोबर संभोग करण्याची बंदी असते. तर भुजिष्या स्त्रीला कोणा एका पुरुषाने खास बाळगलेली असते. तथापि तिला घरात न ठेवता दुसरीकडे ठेवलेली असते.

ज्या वेश्या कोणत्याही एका विशिष्ट पुरुषाने राखलेल्या नसतात· त्यांच्याशी संभोग केल्यास त्याचे पातक लागत नाही किंवा राजाकडून दंड होत नाही· तथापि निरुद्ध दासी, स्वैरिणी इ·स्वरुपातील भुजिष्येशी संभोग केल्यास मात्र याज्ञवल्क्यस्मृतीने दंड सांगितला आहे·

आज ज्याला आपण समाजबहिष्कृत किंवा समाजमान्य नसलेला घटक संबोधितो अशा रखेली स्त्रीचा विचार करून तिच्यावर अत्याचार करणा-यासाठी याज्ञवल्क्यस्मृतीने शिक्षा सांगितली आहे· रखेलीबाबत देखील किती सूक्ष्म विचार केला होता हे यावरून लक्षात येते·

यापुढे याज्ञवल्क्यस्मृती म्हणते-

"जबरदस्तीने दासीशी अभिगमन करणा-यास दशपण दंड सांगितला आहे, अनेक पुरूषांनी एकटया इच्छा न करणा-या स्त्रीशी बलात्काराने गमन केल्यास प्रत्येकाला चोवीस पण दंड करावा·"[19]

मिताक्षरासारात म्हटले आहे- "पुरूषसंभोगावर निर्वाह करणा-या दासी, स्वैरिणी इ·ना·शुल्क न देता बलात्काराने अभिगमन करणा-यास दशपण दंड करावा· जर पुष्कळ पुरूषांनी एकटयाच इच्छा न करणा-या गम्य स्त्री शी बलात्काराने गमन केले तर त्यातील प्रत्येकाला चोवीस पण दंड करावा· पण तिच्या इच्छेने "खर्ची" देऊन मागून इच्छा न करणा-या तिच्याशी जर अनेकांनी बलात्काराने गमन केले तर त्यात त्यांचा काही दोष नाही· पण व्याधियुक्त श्रान्त, व्यग्र व राजकार्यपरायण, अशी एखादी दासी अर्थात वेश्या बोलावल्यावरही संमत संभोगासाठी न आल्यास दोषी होत नाही· याप्रमाणे नारदाचे वचन असल्यामुळे व्याधी इ·दोषांनी युक्त असलेल्या तिचे "खर्ची" घेऊनही संभोगाची इच्छा न केल्यास काही दोष नाही·"

वेश्या व्यवसायावर ज्या स्त्रिया आपला उदरनिर्वाह करतात· अशा स्त्रियांना त्यांच्याकडे येणा-या पुरूषांनी जर मोबदला दिला नाही· तर अन्य काही मार्ग नसल्याने त्या आर्थिक दृष्टीने कमकुवत बनून त्या आपला उदरनिर्वाह करू शकणार नाहीत· यासाठी याज्ञवल्क्याने अशा स्त्रियांना मोबदला न देणा-या पुरूषांना दहा पण दंड सांगितला आहे· त्याचप्रमाणे अनेकांनी एका स्त्रीवर बलात्कार करणे हा देखील गुन्हा मानून याज्ञवल्क्याने त्यासाठी चोवीस पण दंड सांगितला आहे· वास्तविक यापेक्षा

अधिक शिक्षा करणे आवश्यक आहे· या त्याच्या नियमानंतर मिताक्षरासारात याज्ञवल्क्याचे मत दिले आहे· त्यानुसार अशा स्त्रीने संभोगास नकार दिल्याने बलात्कार केल्यास त्या पुरूषांना त्याबद्दल शिक्षा सांगितलेली नाही· याउलट आजारी, दमलेली अशी स्त्री जर पुरूषाने त्याबद्दल मोबदल्याच्या स्वरूपात काही देऊनही संभोगास तयार झाली नाही तर त्यासाठी त्या स्त्रीला म्हणजे वेश्येला देखील शिक्षा नाही·

यानंतर याज्ञवल्क्य म्हणतो -

"गृहीतवेतना वेश्या नेच्छन्ती द्विगुणं वहेत्।
अगृहीते समं दाप्यः पुमानप्येवमेव च।।"[20]

एखाद्या वेश्येने गि-हाईकाकडून मोबदला देऊन त्याला संभोग करण्यास मनाई केली अथवा एखाद्या पुरूषाने वेश्येबरोबर संभोग करून कबूल केलेला मोबदला तिला दिला नाही तर राजाने त्यांना शासन करावे असे सांगितले आहे· याचे अर्थासह स्पष्टीकरण नारदाचे वचन उद्धृत करून मिताक्षरासारात दिले आहे-

"जेव्हा शुल्क घेऊन स्वस्थ असलेली ही वेश्या धन देणा-याची अर्थपतीची इच्छा करीत नाही· तेव्हा तिच्याकडून त्याला दुप्पट शुल्क परत देववावे· पण तिने शुल्क घेतले नसल्यास व नुसती संमती देऊन मागून इच्छा न केल्यास तिच्याकडून जितके शुल्क ठरले असेल तितके त्या पुरूषाला देववावे· त्याचप्रमाणे शुल्क देऊन स्वतः त्या वेश्येची इच्छा न करणा-या स्वस्थ पुरूषाची शुल्कहानी होते· अर्थातच त्याचे धन बुडते· नारदाने याप्रमाणेच सांगून शिवाय आणखी असाही विशेष सांगितला आहे· जो पुरूष एखाद्या पण्यस्त्रीचा उपभोग घेऊन तिचे शुल्क देत नाही, अथवा मारून, दात, नखे, इ·कांवर प्रहार करून व आक्रमण करून तिचा उपभोग घेतो, जो योनिरहित स्थानी मैथुन करतो किंवा अनेकांकडून भोग घेववितो, त्याच्याकडून वेश्येला आठपट शुल्क देववावे व तितकाच दंड करावा· वेश्येसंबंधी काही कार्य उपस्थित झाले असता आलेल्या संशयाचा निर्णय वेश्येच्या घरातील वृद्ध स्त्री अथवा तिच्या येथे राहणारे कामुक यांच्या द्वारा करावा·"

याज्ञवल्क्याने "जो पुरूष आपल्या स्त्रियांच्या मुख इत्यादी ठिकाणी गमन करतो किंवा पुरूषापाशी गुदस्थानी गमन करतो अथवा प्रव्राजिता स्त्रीशी गमन करतो त्याला चोवीस पण दंड करावा·"[21] असे सांगितले आहे·

"अन्त्या म्हणजे चाण्डाली· तिच्याशी गमन करून प्रायश्चित्त करावयास तयार न होणा-या तीन वर्णांच्या द्विजाती पुरुषांना "सहस्त्रं त्वन्त्यजस्त्रियं" या मनुवचनाच्या अनुरोधाने सहस्त्र पण दंड करून भगाच्या आकाराच्या निंद्य बंधाने चिन्हित करावे व आपल्या राष्ट्रातून घालवावे· पण जे प्रायश्चित्त करण्यास तयार असतील त्यांना नुसता दंडच करावा· शूद्र पुरुषाने चांडालीशी गमन केल्यास तो स्वतः चाण्डालच होतो· अंत्यजा म्हणजे चांडालीने उत्कृष्ट जातीच्या स्त्रीशी गमन केल्यास त्याचा वध करावा·"[22] असे म्हटले आहे·

"रखेली स्त्रियांच्या पालनपोषणाचा विचार देखील याज्ञवल्क्यस्मृतीने केला आहे· रखेलीला पुरुषाच्या हयातीत त्याच्यावर फिर्याद करता येत नाही· परंतु मृत ब्राह्मणाने स्वतःकरता बाळगलेल्या सर्व प्रकारच्या रखेल्यांना जर त्या-त्या पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याच्याशी सतत एकनिष्ठ राहत असतील तर त्या पुरुषाच्या मिळकतीतून पालनपोषण मिळण्याचा हक्क असल्याचे सांगितले आहे·

<u>सारांश</u> :-

1· याज्ञवल्क्यस्मृतीने देखील अन्य धर्मशास्त्रांप्रमाणे स्त्री-पुरुष संबंधाची चर्चा अतिशय सूक्ष्मपणे केली आहे· हे परस्परातील संबंध शुद्ध स्वरूपात राहावेत, अशाप्रकारचा स्मृतिकारांचा आग्रह दिसतो· हे संबंध बिघडल्यास त्याचा परिणाम स्त्री जीवनावर आणि पर्यायाने समाजावर होत असतो· तेव्हा अशा संबंधाला बाधा निर्माण करणा-या पुरुषाला व स्त्रीलाही जबाबदार मानून याज्ञवल्क्यस्मृतीने शिक्षा सांगितली आहे·

2· स्त्री संग्रहणाचे तीन प्रकार सांगून त्या बाबतच्या शिक्षा सांगितल्या आहेत· ही शिक्षा त्या अपराधांशी संबंध असलेला पुरुष आणि स्त्री यांची जात, ती स्त्री विवाहित की अविवाहित होती, ती स्त्री संरक्षित की असंरक्षित होती याला अनुसरून भिन्न सांगितली आहे· ही शिक्षेबाबतची व्यवस्था भेदावर आधारीत दिसते· अपराधाबाबत सर्वांना समान शिक्षा असणे आवश्यक·

3· कन्येचा अपहार केल्याबद्दल, तिला नसलेल्या दोषांनी दूषित केले असता· इ· स्त्री संग्रहणाबाबत प्रथम साहस दंडापासून ते करच्छेद, वधापर्यंत अत्यंत कडक शिक्षा सांगितल्या आहेत·

4. रखेली स्त्रियांचे अवरुद्धा व भुजिष्या असे दोन प्रकार सांगितले आहेत. आज आपण समाजबहिष्कृत म्हणून मानत असलेल्या या स्त्रियांच्या संग्रहणाबाबतही याज्ञवल्क्यस्मृतीने दंडयोजना सांगितली आहे.

वेश्या व्यवसायावर उदरनिर्वाह करणा-या अशा स्त्रियांना मोबदला न देणा-या पुरुषासाठी दंड सांगितला आहे. या उलट मोबदला घेऊनही आजारपण इ.कारणास्तव वेश्येने संभोगास नकार दिल्यास तिला त्याबाबत शिक्षेतून याज्ञवल्क्याने सूट दिली आहे. रखेलीच्या पालनपोषणाचा विचारही याज्ञवल्क्यस्मृतीने केला आहे.

5. स्त्री-संग्रहणाच्या प्रकरणामध्ये याज्ञवल्क्यस्मृतीने समाजामध्ये स्त्रीवर अत्याचार किंवा अन्याय करणा-यांच्या प्रवृत्तीला आळा बसावा, यासाठी तिच्या रक्षणाच्या दृष्टीने उपाययोजना केली आहे. तिची व्यवस्था लावण्याच्या दृष्टीने स्मृतिकाराने किती तपशीलवार विचार केला होता हे यावरून दिसते.

**दौहृद :-**

यतिधर्मप्रकरणामध्ये याज्ञवल्क्याने गर्भवतीच्या दौहृदविषयी म्हटले आहे-

"दौहृदस्याप्रदानेन गर्भो दोषमवाप्नुयात्।
वैरूप्यं मरणं वापि तस्मात्कार्यं प्रियं स्त्रियाः।।"[23]

याज्ञवल्क्याच्या या श्लोकावर अपरार्क म्हणतो-

"गर्भवत्या अपेक्षितं वस्तुदोहदः तस्याप्रदानेन गर्भस्य दोषो
व्याध्यादिर्विरूपता अङ्गविकलता मरणं वा स्यात्। एतस्मात् हेतोः
स्त्रियाः प्रियम् कार्यम्। दोहदः देय इत्यर्थः।"

मिताक्षरासारामध्ये देखील असे म्हटले आहे- "गर्भाचे एक हृदय व गर्भिणी स्त्रीचे दुसरे, अशा रीतीने गर्भिणी द्विहृदया म्हणजे दोन हृदयांनी युक्त होते म्हणून तिला जे इष्ट असते त्याला दौहृद म्हणतात. ते तिला न दिल्याने गर्भ विद्रूपतेस अथवा मरणरूपतेस प्राप्त होतो. म्हणून या दोन्ही गोष्टी टाळण्यासाठी गर्भिणी स्त्रीचे जे अभिलषित ते पुरवावे."

प्रस्तुत ठिकाणी याज्ञवल्क्याने गर्भवतीच्या दोहदपूर्तीचा विचार मांडला आहे. त्यामध्ये स्त्रीचे प्रिय करणे महत्त्वाचे नसून तिच्या गर्भासाठी तिचे प्रिय करणे महत्त्वाचे समजण्यात आले आहे, तो गर्भ पुरुषगर्भ आहे, हे त्यामध्ये गृहीत धरले आहे.

**प्रायश्चित्त :-**

प्रायश्चित्त ही एक प्रकारची शिक्षाच आहे. तथापि गुन्हयाला सवड असेच त्याचे स्वरूप वाटते.

प्रायश्चित्त या प्रकरणामध्ये पातके, महापातके, उपपातके, त्यांचा परिणाम आणि या पातकांचा परिहार करण्यासाठी उपाय इ.चर्चा याज्ञवल्क्याने केली आहे.

प्राचीन काळापासून पातक लागणा-या कृत्यांची नावे आणि त्यांची महत्त्वानुसार वर्गवारी आणि विभागणी निरनिराळ्या ग्रंथात सांगितलेली आढळते. कात्यायनाने[24] पातकांचे पाच वर्ग केले आहेत निरुक्तामध्ये ब्रह्महत्या इ. सात पातके सांगितली आहेत.

पातकाची व्याख्या देत असता डॉ.म.म.काणे[25] म्हणतात- "या शब्दाची व्याख्या करणे फार अवघड असले तरी सामान्यपणे असे म्हणता येईल, की हे कृत्य केलयाने देवाने सांगितलेल्या अथवा देवप्रणीत मानलेल्या धर्मग्रंथात दिलेल्या नियमांचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन होते अथवा अवज्ञा होते अथवा निदान अशा ग्रंथात घालून दिलेल्या नियमांचे परिपालन केले जात नाही ते कृत्य पातक."

स्त्रियांशी संबंधित असलेल्या पातक इ.संबंधी याज्ञवल्क्याने खालीलप्रमाणे चर्चा केलेली आढळते.

"गुरुतल्पग" म्हणजे गुरुभार्यागमन हे याज्ञवल्क्याने महापातक म्हणून सांगितले आहे.[26] "गुरुस्त्रीशी गमन करणारा कुष्ठरोगी होतो"[27] असेही म्हटले आहे.

यानंतर गुरुतल्पाचा निर्देश करीत असताना याज्ञवल्क्य म्हणतो, "पित्याची बहीण, मावशी, मामी, स्नुषा, सावत्र आई, बहीण, आचार्य कन्या, आचार्यांची भार्या, स्वसुता इ.शी गमन करणा-या पुरुषाचे लिंग तोडवून राजाने दंडार्थ वध करावा."[28]

या विषयी मिताक्षरासारात म्हटले आहे "मातृश्च शब्दाने राणी, संन्यासीण, चुलती, शिष्याची स्त्री, बहिणीची मैत्रीण, आश्रयाला येऊन राहिलेली, दायी, साध्वी स्त्री, उत्तम वर्णाची स्त्री व वेश्येसारख्या सर्वसामान्य स्त्रियांचेही ग्रहण करावे. हा लिंगच्छेद

व वधरूप दंड ब्राह्मणाव्यतिरिक्त पुरूषास उद्देशून सांगितलेला आहे. कारण "न जातु ब्राह्मण्यं हन्यात्" असा निषेध आहे. जेव्हा या स्त्रिया स्वतः सकाम होऊन आपल्या त्या-त्या संबंधी पुरूषांस आपल्याला वश करून घेतात व त्यांचा उपभोग घेतात तेव्हा त्यांचाही पुरूषांप्रमाणे वधच करावा. कारण तोच त्यांना योग्य दंड व तेच योग्य प्रायश्चित्त आहे. गुरू अधिक्षेपापासून कन्यागमनापर्यंत सांगितलेली ही तत्काल पतनाची निमित्ते असल्यामुळे पातके होत. कारण यमाने "मावशी, आईची मैत्रीण, कन्या, आत्या, मामी, बहीण व सासू यांच्याशी गमन केल्यास पुरूष तत्काल पतित होतो" असे म्हटले आहे."

जर एखाद्या पुरूषाने निकटच्या नात्याच्या स्त्रीबरोबर तिच्या संमतीने संभोग केला तर त्या स्त्रीला अशा पुरूषाच्या इतके प्रायश्चित्त सांगावे आणि मृत्यू ही कायदेशीर शिक्षा द्यावी, असे या वरील श्लोकात §3.233§ याज्ञवल्क्याने सांगितले आहे. हे त्याचे मत योग्य वाटते. तथापि ब्राह्मणास निर्दोष सोडणे योग्य वाटत नाही. सर्वांना समान शिक्षा हवी.

अर्थात या श्लोकात गुरूतल्पगमनाचे पातक हे मातृभगिनी किंवा पितृभगिनी यांच्यासारख्या अनेक निकटसंबंधी स्त्रियांच्या बरोबरीच्या संभोगाला लागते असे सांगितले आहे.

जरी अनेक अपराधांना महापातकांच्या व्याख्या शब्दशः लागू पडत नसल्या तरी देखील त्यांचा समावेश तुलनेने महापातकांसारखाच करून निषेध केला आहे. या विषयी याज्ञवल्क्य म्हणतो- "जो कोणी यज्ञदीक्षा घेतलेल्या क्षत्रियांचा अथवा वैश्याचा वध करतो अथवा आत्रेयी म्हणजे रजस्वला स्त्रीचा वध करतो त्याला ब्रह्महत्येसाठी करावयाच्या प्रायश्चिनासारखेच प्रायश्चित्त करावे लागते. मिताक्षरासारात आणखी पुढे असे म्हटले आहे- विवाहित स्त्रीच्या ठिकाणी झालेल्या गर्भाला मारल्यास तो गर्भ ज्या वर्णाचा असेल त्या वर्णाच्या पुरूषाला जे प्रायश्चित्त सांगितले असेल तेच करावे. हे विधान ज्या गर्भाचे ठायी अद्यापी स्त्री-पुरूष इ. व्यंजक चिन्हे उत्पन्न झालेली नाहीत, त्या गर्भाच्या वधाविषयी आहे. ब्राह्मणगर्भालाही ब्राह्मणत्व असतेच, त्यामुळे त्या गर्भाला मारल्यास ब्राह्मणवधाचेच प्रायश्चित्त प्राप्त होईल, हे जरी खरे आहे तरी, एखादे वेळी तो गर्भ स्त्री असण्याचाही संभव आहे व स्त्रीचा वध हे महापातक नसून उपपातक आहे. म्हणून गर्भनाश केल्यास

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

तो मुलगा आहे की मुलगी आहे याचा निर्णय न झाल्यासही ब्रह्महत्याव्रत करावे आणि असे सांगत असल्यामुळे हे अतिदेशवचन अर्थवान आहे, निरर्थक नव्हे पण गर्भ स्त्री आहे की पुरुष आहे याचे विशेष ज्ञान झाल्यास स्त्रीवधाचे उपपातकयुक्त प्रायश्चित्त व पुरुषवधाचे द्वादशवार्षिक व्रत हे प्रायश्चित्त घ्यावे·

जो आत्रेयीला मारणारा त्याने तिच्या वर्णानुसार व्रत करावे· आत्रेयी ऋतुमती स्त्री किंवा अत्रिगोत्रजा· या दोन्ही वाक्यांचा भावार्थ असा- ब्राह्मणगर्भाचा किंवा ब्राह्मणी रजस्वलेचा वध केला असता ब्रह्महत्याव्रत करावे· क्षत्रियगर्भाचा व क्षत्रिय आत्रेयीचा वध केला असता क्षत्रियवधास सांगितलेले व्रत करावे· वैश्य इ·विषयी देखील असेच समजावे· वर सांगितलेल्या स्त्रियांशिवाय इतर स्त्रियांचा वध घडल्यास ते उपपातक होय· महापातक नव्हे·"

"सखीभार्याकुमारीषु स्वयोनिष्वन्त्यजासु च।
सगोत्रासु सुतस्त्रीषु गुरुतल्पसमं स्मृतम्।।"[29]

"मित्रपत्नी, उत्तमजातीची कन्या, भगिनी, चाण्डाली, समान गोत्रातील स्त्री, व स्नुषा यांच्याशी गमन करणे, हे गुरुतल्पगमनासारखे आहे· पण हे म्हणणे रेतःसेकापूर्वी निवृत्त झाल्यास गुरुतल्पसमत्व नसून किंचित न्यूनत्व असते· त्यामुळे प्रायश्चित्तही कमी प्राप्त होते· सगोत्रा स्त्रीचे ग्रहण केलेले असतानाही पुन्हा स्नुषेचे जे ग्रहण केले आहे ते स्नुषागमनाचे प्रायश्चित्त अधिक करावे लागते हे सांगण्यासाठी आहे·"[30]

**गुरुतल्पगमन :-**

यापूर्वी याज्ञवल्क्याने गुरुतल्पगमन इ·महापातकाबाबत सांगितले· त्याबद्दल घ्यावयाच्या प्रायश्चित्ताचे स्वरूप कसे हे सांगत असता याज्ञवल्क्यस्मृती म्हणते -

"तप्तेऽयःशयने सार्धमायस्या योषिता स्वपेत्।
गृहीत्वोत्कृत्य वृषणौ नैर्ऋत्यां चोत्सृजेत्तनुम्।।"[31]

अपराध्याने आपला अपराध कबूल करावा आणि त्याचे प्रायश्चित्त म्हणून तापवून लाल केलेल्या लोखंडी शय्येवर तापवून लाल केलेल्याच लोखंडी स्त्री-प्रतिकृतीसह गुरुभार्येशी गमन करणाऱ्याने शयन करावे किंवा लिंगासह वृषण स्वतः कापून व त्यांना ओंजळीत घेऊन नैर्ऋत्य दिशेत सरळ मार्गाने देहपात होईपर्यंत गमन करावे· असे केले असता अपराधी शुद्ध होत असल्याचे सांगितले आहे·

"वृद्ध हारीताने "शयन करावयाचे ते त्या स्त्रीला आलिंगन देऊन करावे असे म्हटले आहे· वसिष्ठाच्या आज्ञेप्रमाणे लोम व केस काढून व सर्वांगास घृत लावून हे शयनरूप प्रायश्चित्त करावे असे म्हटले आहे· शंखाच्या मतानुसार शिश्न व दोन्ही वृषण वस्त्या-याने कापावे व मागे न पाहता नैर्ऋत्य दिशेस जावे· पण जात असताना पुढे भिंत वगैरे येऊन प्रतिबंध झाल्यास वसिष्ठानुसार, मरेपर्यंत तेथेच राहावे, असे सांगितले आहे· नारदानेही असेच प्रायश्चित सांगितले आहे· मनुने तप्तलोहशयन व लोखंडाच्या तापवून लाल केलेल्या मूर्तीला आलिंगन हे प्रायश्चित्त सांगितले आहे·

पितृपत्नीगमन हे महापातक म्हणून सांगितले आहे· याची दोन मरणान्त प्रायश्चित्ते या श्लोकात दिली आहेत· पण त्यातील कोणते तरी एक प्रायश्चित मातेच्या ठिकाणी अज्ञानात गमन घडल्यास व तिच्या सवर्ण अथवा उत्तम जातीच्या सवतीशी ज्ञानतः गमन केल्यास आचरावे· यापुढे असे म्हटले आहे- मातेच्या ठिकाणी कामतः गमन केल्यास वसिष्ठांच्या वचनाप्रमाणे सर्व केस व लोम काढून सर्वांगास घृत माखून शेणीच्या अग्नीने पायापासून आपणास जाळून घ्यावे· अज्ञानतः जननी गमनाचा अपराध घडल्यासही हेच प्रायश्चित्त करावे·

दोघांच्या इच्छेने वरील निंद्य कर्म घडल्यास "तप्तशयन" हे प्रायश्चित्त व स्वतः पुत्राने त्याला प्रोत्साहन दिल्यास "वृषण कापून ओंजळीत घेऊन नैऋत्येस जाणे" हे सांगितले आहे· तथापि स्त्रीने आपण होऊन प्रोत्साहन दिलेले असल्यास मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे तप्तलोहशयन व लोखंडाच्या तापवून लाल केलेल्या मूर्तीला आलिंगन या दोन प्रायश्चित्तातील कोणते तरी एक करावे असे म्हटले आहे·

शंखाने "अधःशायी जटाधारी" इ·वचनाने जे द्वादशवार्षिकव्रत सांगितले आहे ते समवर्णाच्या किंवा असमवर्णाच्या पितृपत्नीशी गमन केल्यास किंवा अकामतः गुरूभार्यागमन झाल्यास जाणावे तिच्याशीच कामतः प्रवृत्त होऊन रेतःसेकाच्या पूर्वी निवृत्त झाल्यास षड्वार्षिकव्रत, अकामतः प्रवृत्त होऊन चरम धातू सोडण्यापूर्वी निवृत्त झाल्यास त्रैवार्षिकव्रत, जननीच्या ठिकाणी कामतः प्रवृत्त होऊन रेतःसेकाच्यापूर्वी निवृत्त झाल्यास द्वादशवार्षिकव्रत व अकामतः प्रवृत्त होऊन तत्काल् निवृत्त झाल्यास सहा वर्षाचे व्रत कल्पावे· संवर्ताने "पितृदारान्समारुह्य मातृवर्जं नराधमः" इ·वचनाने नुसत्या समारोहणानेच जे तप्तकृच्छ्र प्रायश्चित्त सांगितले आहे· ते हीन वर्णाच्या गुरूभार्येशी गमन करणा-यास प्रवृत्त होऊन रेतःसेकापूर्वी निवृत्त झाल्यास जाणावे·"32

गुरूभार्यागमन करणा-या पुरूषासाठी याशिवाय आणखी दुसरे प्रायश्चित्त असे सांगितले आहे·-

"प्राजापत्यं चरेत्कृच्छ्रं समा वा गुरूतल्पगः।
चान्द्रायणं वा त्रीन्मासानभ्यसेद्वेदसंहिताम्।।"[33]

एकंदरीत पाहता "गुरूतल्पगमन" या सारख्या महापातकासाठी याज्ञवल्क्य इ·नी सांगितलेले प्रायश्चित्त हे अपराध्यासाठी अत्यंत भयंकर आहे· एकप्रकारे मृत्यूदंडाप्रमाणेच आहे·

सुरापानासाठी पातके कोणती ते सांगत असताना - "रजस्वलेची कामना नसल्यामुळे तिच्या मुखासवाचे सेवन करणे हे सुरापान अर्थात महापातक मानले आहे·[34] सुवर्णस्तेय हे देखील महापातक म्हणून मानले आहे· त्यापैकी "स्त्री चा अपहार करणे हे सुवर्णस्तेयासारखे आहे"[35] असे म्हटले आहे· अर्थात महापातकासाठी आवश्यक असणारे प्रायश्चित्त यासाठी घ्यावे लागते·

महापातके, तत्सम पातके इ·विषयी याज्ञवल्क्याने सांगितल्यावर उपपातकांविषयी सांगितले आहे· त्यामध्ये स्त्री-विषयक उपपातके ही पुढीलप्रमाणे सांगितली आहेत· गुरूभार्या व तत्तुल्य स्त्रियां यांना सोडून इतर परस्त्रीशी गमन करणे, स्त्रीवध, ब्रह्मचर्याने स्त्रीप्रसंग करणे, अपतित मातेचा त्याग करणे, कन्येला दूषित करणे, परिवेदकाला कन्या देणे, मद्यपान केलेल्या स्वभार्येचा उपभोग घेणे, स्त्रीच्या योगाने निर्वाह करणे म्हणजे स्त्रीला मजुरीला लावून तिच्या कष्टाने मिळविलेल्या धनावर अथवा स्त्रीधनावर निर्वाह करणे, अविवाहित सवर्ण स्त्री, केवळ हीन वर्णाची स्त्री व साधारण स्त्री यांचा संभोग घेणे, भार्येचा विक्रय करणे ही सर्व उपपातके आहेत, असे म्हटले आहे·[36]

सुरापानप्रायश्चित्तप्रकरणामध्ये ब्राह्मणपत्नीविषयी सांगत असता याज्ञवल्क्य म्हणतात, "जी ब्राह्मणाची भार्या सुरा पिते ती मोठी पुण्यवती असली तरी पतीच्या लोकास जात नाही, तर याच लोकी कुत्री, गृध्री, सूकरी होते·"[37]

सुरापान करणारी ब्राह्मणी किंवा स्त्री ही हीनयोनीला जाते· स्त्रियांनी सुरापान म्हणजे मद्य पिऊ नये हे विशेषत्वेकरून सांगण्यासाठी याज्ञवल्क्याने प्रस्तुत नियम केलेला आहे·

संसर्गप्रायश्चित्तप्रकरणामध्ये पतितसंसर्ग प्रतिषेधाने निषिद्ध झालेल्या यौनसंबंधाचा प्रतिप्रसव याज्ञवल्क्याने असा सांगितला आहे·

"कन्यां समुद्वहेदेषां सोपवासामकिञ्चनाम्।।"[38]

"पतिताच्या पतित अवस्थेत उत्पन्न झालेल्या कन्येशी विवाह करावा· पण तिच्याकडून उपवास व केलेल्या संसर्गकालास उचित प्रायश्चित्तही करून विवाहसमयी तिच्या पित्याचे वस्त्र, अलंकार इ·काही धन घेऊ नये· "समुद्वहेत्" असे म्हटलेले असल्यामुळे जिने पतित संसर्ग टाकला आहे, अशा कन्येचे वराने स्वतः पाणिग्रहण करावे· तिच्या पित्यापासून प्रतिग्रह करू नये, असे केल्यास पतितांच्या संसर्गाचा जो निषेध केला आहे, त्याच्याशी विरोध येत नाही· हाच अर्थ वृद्ध हारीताने असा स्पष्ट केला आहे· वस्त्ररहित व अहोरात्र उपोषण केलेल्या पतिताच्या कुमारीस प्रातःकाळी वराने आपल्या नव्या धुतलेल्या शुक्लवस्त्राने आच्छादित करून तिच्याकडून "मी त्यांची नव्हे, ते माझे नव्हेत" असे मोठयाने म्हणवावे· नंतर तीर्थाचे ठिकाणी किंवा स्वगृही तिच्याशी विवाह करावा· "एषां कन्यां" असे म्हणून योगीश्वर पतितांची कन्येवाचून इतर अपत्ये संसर्गास योग्य नाहीत, असे सुचवीत आहेत· वसिष्ठानेदेखील "कन्येशिवाय पतिताने उत्पन्न केलेला पतित होतो, कन्या मात्र परगामिनी असल्यामुळे पतित होत नाही· यास्तव तिचे पाणिग्रहण धनावाचून करावे·"[39]

पतित हा स्वतः निंद्य असला तरी त्याच्या मुलीचा काहीच दोष नसतो· तेव्हा अशा मुलीकडे, तिचा पती वाईट म्हणून ती देखील तशीच असावी, या दृष्टीने समाज पाहत असतो· तिची हेटाळणी करीत असतो· तिचा विवाह देखील होणे कठिण जाते· तथापि अशा कन्येचा विवाहाबाबतीत वरील महत्त्वपूर्ण नियम सांगितला आहे· हे त्याचे मत पुरोगामी विचारसरणीचे असले तरी तिने उपवास इ·प्रायश्चित्त करावे किंवा पितृकुलाशी संबंध तोडावा हे योग्य वाटत नाही· कोणत्याही अटीशिवाय पतितकन्येचा वराने स्वीकार करावा·

**स्त्रीवध :-**

प्रायश्चित्तप्रकरणातील स्त्रीवधाचे प्रायश्चित्त याज्ञवल्क्याने असे सांगितले आहे-

"दुर्वृत्तब्रह्मविट्क्षत्रशूद्रयोषः प्रमाप्य तु।
दृतिं धनुर्वस्तमविं क्रमाद्दद्याद्विशुद्धये।।"[40]

ब्राह्मण इ·चार वर्णांच्या स्वैरिणी स्त्रियांस मारून क्रमाने दृती, धनुष्य, बकरा व मेंढा शुद्धिकरता द्यावा·

किंवा किंचित् व्यभिचार केलेल्या ब्राह्मणी इ·स्त्री वध केल्यास शूद्रहत्याव्रता[41]चे आचरण करावयास सांगितले आहे·

"जो नियोगाशिवाय ज्येष्ठ किंवा कनिष्ठ भ्रात्याच्या भार्येशी गमन करतो त्याने चांद्रायण करावे· त्याचप्रमाणे जो आपल्याच रजस्वला भार्येशी गमन करतो तो त्रिरात्र उपोषण करून शेवटी घृतप्राशनाने शुद्ध होतो·[42] असे म्हटले आहे·

प्रायश्चित्तप्रकरणातील प्रकीर्णक प्रायश्चित्तविषय सांगत असता "दिवसा आपल्या स्त्रीचा संभोग घेतल्यास स्नान करून प्राणायामाने पुरूष शुद्ध होतो"[43] असे सांगितले आहे·

स्त्रियांनी हीन वर्णाच्या जातीशी गमन करणे, गर्भपात करणे, अब्राह्मण स्त्रीने ब्राह्मणेतर पतीची हिंसा करणे इ·प्रकारच्या स्त्रियांना याज्ञवल्क्याने पतित असे म्हटले आहे· तथापि या पतित स्त्रियांना त्यांच्या कृत्याबद्दल प्रायश्चित्त सांगितले असले तरी अशा स्त्रियांना पूर्णपणे वा-यावर सोडून देऊन आपली व्यवस्था वाटेल त्या रीतीने लावण्याची मोकळीक दिलेली नाही· तर तिच्या बाबतीत काय करावे हे सांगत असता याज्ञवल्क्य म्हणतो-

"पतितानामेष एव विधिः स्त्रीणां प्रकीर्तितः।
वासो गृहान्तिके देय अन्नं वासः संरक्षणम्।।"

पतित स्त्रियांना घराजवळच तृणपर्णमय कुटी म्हणजे झोपडी करून द्यावी· केवळ प्राणधारणा होईल इतके अन्न द्यावे, मलिन वस्त्रे द्यावीत व दुसरा कोणी पुरूष तिचा उपभोग घेणार नाही अशी व्यवस्था करावी·

याप्रमाणे याज्ञवल्क्याने पतित स्त्रीचा सहानुभूतीपूर्वक विचार केला आहे· तिचे अधिक अधःपतन होऊ नये याची काळजी त्याने घेतली आहे·

**सारांश :-**

1· यतिधर्मप्रकरणामध्ये याज्ञवल्क्याने गर्भवतीच्या दोहदपूर्तीबाबत विचार मांडला आहे· यामध्ये स्त्रीचे प्रिय करणे महत्त्वाचे नाही, तर तो गर्भ पुरूषगर्भ आहे

हे गृहीत धरून अशा गर्भासाठी प्रिय करणे महत्त्वाचे समजण्यात आले आहे·

2· गुरुभार्यागमन हे याज्ञवल्क्याने महापातक मानले आहे· जर एखाद्या पुरुषाने निकटच्या नात्याच्या स्त्रीबरोबर तिच्या संमतीने संभोग केला तर त्या स्त्रीला अशा पुरुषाच्या एवढेच प्रायश्चित्त सांगावे आणि मृत्यू ही कायदेशीर शिक्षा द्यावी असे म्हटले आहे· याप्रमाणे कठोर शिक्षेबाबत सांगणा-या याज्ञवल्क्याने ब्राह्मणास मात्र निषेधवचनावरून निर्दोष सोडले आहे· सर्वांना समान शिक्षा हवी·

3· याज्ञवल्क्याने स्त्रीच्या वधाला उपपातक मानून त्यासाठी घ्यावयाचे प्रायश्चित्त सांगितले आहे· परंतु त्याचे स्वरूप गुन्हेगाराला सवड असे वाटते·

4· "गुरुतल्पगमनासाठी" सांगितलेले तप्तशयन इ·प्रायश्चित्त अपराध्यासाठी अत्यंत भयंकर एकप्रकारे मृत्यूदंडच आहे· तथापि वर्णानुसार भिन्नता सांगून एकात्मतेस बाधा आणली आहे·

5· पतित कन्येच्या स्वीकाराबाबतचा याज्ञवल्क्याचा नियम पुरोगामी विचारसणीचा असला तरी त्यातील अटी अयोग्य वाटतात·

6· पतित स्त्रियांना निवारा इ·देण्याबाबतचा याज्ञवल्क्याचा दृष्टिकोण सहानुभूतीचा दिसतो·

**संदर्भ :-**


1· या·स्मृ·मिताक्षरासार 2·24·283

2· या·स्मृ·2·24·283

3· या·स्मृ·2·24·284

4· मनुस्मृती : अध्याय 8·355

5· मनुस्मृती : अध्याय 8·358

6· बृह·पौ·ध·ग्रं·33 पा·366

7· या·स्मृ·2·24·285

8· मनुस्मृती 8·362

9· मनुस्मृती 8·362

10· या·स्मृ·2·24·286

11· मनुस्मृती अ·8·376 व 377

12· मनुस्मृती अ·8·374

13· मनुस्मृती अ·8·351

14· या·स्मृ·2·24·287

15· या·स्मृ·मि·सार 2·24·288

16· मनुस्मृती 8·368

17· या·स्मृ·2·24·289

18· या·स्मृ·2·24·290

19· या·स्मृ·2·24·291

20· या·स्मृ·2·24·292

21· या·स्मृ·2·24·293

22· या·स्मृ·मि·सार 2·24·294

23· या·स्मृ·3·4·79

24· मिता·याज्ञ·3·227

25· धर्मशास्त्राचा इतिहास, म·म·काणे (मूळचे), सारांशरूप ग्रंथ, अनुवादक- यशवंत भट

26· या·स्मृ·3·5·227

27· या·स्मृ·3·5·209

28· या·स्मृ·3·5·232 व 233

29· या·स्मृ·3·5·231

30· या·स्मृ·मिता·सार 3·5·231

31· या·स्मृ· 3·5·259

32· या·स्मृ·मि·सार 3·5·260

33· या·स्मृ·3·5·260

34· या·स्मृ·3·5·229

35· या·स्मृ·3·5·230

36· या·स्मृ·3·5·234 ते 242

37· या·स्मृ·3·5·256

38· या·स्मृ·3·5·261

39· या·स्मृ·मि·सार 3·5·261

40· या·स्मृ·3·5·268

41· या·स्मृ·3·5·269

42· या·स्मृ·3·5·287

43· या·स्मृ·3·5·290

44· या·स्मृ·3·5·296